महाराष्ट्र राज्य
कला शिक्षण मंडळ, मुंबई
सर ज. जी. कला शाळा आवार, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१. फोन. नं. ०२२ २५१७२१६९/७०
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

Maharashtra State
Board of Art Education, Mumbai
Sir J. J. School of Art compound, Dr. D. N. Road,
Fort, Mumbai- 400 001. Ph. No. 022 25172169 / 70
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

क्रमांक- कशिमं/वार्षिक परीक्षा/२०२६/पाच/263 दिनांक 25 FEB 2026

वाचावे : १) परिपत्रक क्र. कशिमं/वार्षिक-२०२६/पाच/१८४, दिनांक ०९.०२.२०२६
२) परिपत्रक क्र. कशिमं/वार्षिक-२०२६/पाच/२०९, दिनांक १२.०२.२०२६
३) परिपत्रक क्र. कशिमं/वार्षिक-२०२६/पाच/२२४, दिनांक १३.०२.२०२६

## परिपत्रक

## शासकीय उच्चकला वार्षिक परीक्षा २०२६ सुरळीतपणे पार पाडण्याबाबत...

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाकडून आयोजित करण्यात येणाऱ्या शासकीय उच्चकला वार्षिक परीक्षा २०२६ करिता कला परिसंस्थांची नोंदणी/माहिती अद्ययावत करणे तसेच परीक्षेस पात्र विद्यार्थ्यांचे परीक्षा आवदेनपत्र व परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने विहित कालावधीत सादर करण्याबाबत उपरोक्त दिनांक १२.०२.२०२६ रोजीच्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले आहे. तसेच, उक्त दिनांक १३.०२.२०२६ रोजीच्या परिपत्रकान्वये परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक कला शिक्षण मंडळाच्या **https://msbae.ac.in** या संकेतस्थळावर तसेच उच्चकला परीक्षेच्या **https://mis.msbae.in** या लिंकवर प्रसिध्द करण्यात आले आहे.

०२. शासकीय उच्चकला वार्षिक परीक्षेचे आयोजन नोंदणीकृत कला परिसंस्थांवर जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार मौखिक, सैध्दांतिक व प्रात्यक्षिक स्वरुपात करण्यात येणार आहे. सदर परीक्षेचे सर्वसाधारण स्वरुप पुढीलप्रमाणे असेल.

**क) मौखिक परीक्षा** : गतवर्षीप्रमाणे मौखिक विषयांच्या परीक्षा संबंधित कला परिसंस्थेंचे अधिष्ठाता/विभागप्रमुख/प्राचार्य व एक ज्येष्ठ अध्यापक अथवा वर्ग शिक्षक यांच्या द्विसदस्यीय समितीकडून वेळापत्रकानुसार घेण्यात याव्यात. तसेच, समितीकडून विद्यार्थ्यांच्या मौखिक परीक्षेचे मुल्यांकन करण्यात यावे. मुल्यांकनाअंती विद्यार्थ्यांना मौखिक विषयात प्राप्त होणारे गुण तसेच परिसंस्था स्तरावरील अंतर्गत विषयांचे गुण नमूद करण्यासाठी आवश्यक असलेले गुणतक्ते उच्चकला परीक्षेच्या उपरोक्त लिंकवर Notifications या टॅब अंतर्गत उपलब्ध करुन देण्यात येतील. सदर गुणतक्त्याची प्रिंटआऊट काढून त्यावर विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक अनुक्रमे नमूद करावे व त्यानुसार मुल्यांकनाअंती देण्यात आलेले मौखिक विषयांचे गुण नमूद करण्यात यावे. अनुपस्थित विद्यार्थ्यांच्या बैठक क्रमांकासमोर AB असे स्पष्टपणे नमूद करावे.

**ख) सैध्दांतिक व प्रात्यक्षिक परीक्षा** : सैध्दांतिक व प्रात्यक्षिक विषयांच्या परीक्षा जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार आयोजित करण्यात येतील. सदर विषयांच्या परीक्षेकरिता लागणाऱ्या प्रश्नपत्रिका गोपनीय स्वरुपात ऑनलाईन पध्दतीने संबंधित कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य यांच्या लॉगिनवर संबंधित विषयाच्या परीक्षेच्या एक दिवस अगोदर सकाळी ११.०० वाजता पाठविण्यात येतील. कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य यांनी ऑनलाईन पध्दतीने प्राप्त होणाऱ्या प्रश्नपत्रिकांच्या विद्यार्थी संख्येनुसार गोपनीयरित्या प्रिंटआऊट काढून प्रश्नपत्रिकांच्या प्रती विषयनिहाय स्वतंत्र लिफाफ्यात मोहोरबंद करुन आपल्या अभिरक्षेत ठेवाव्यात. संबंधित विषयाची परीक्षा सुरु होण्यापूर्वी मोहोरबंद केलेल्या प्रश्नपत्रिकांचा लिफाफा परीक्षा हॉलमध्ये उपस्थित विद्यार्थ्यांच्या समक्ष ०२ परीक्षार्थींच्या दिनांकित स्वाक्षरीसह वेळ नमूद करुन उघडण्यात आल्यानंतर विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिकांचे वाटप करण्यात यावे. प्रस्तुत प्रकरणी गोपनीयतेचा भंग होणार नाही, याबाबत संबंधित कुलसचिव/अधिष्ठाता/विभागप्रमुख/प्राचार्य यांनी विशेष दक्षता घ्यावी.

०३. शासकीय उच्चकला परीक्षा वेळापत्रकानुसार सुरळीतपणे पार पाडण्यासाठी परीक्षा केंद्रावर कंडक्टर, सुपरवाझर, लिपिक, शिपाई, सफाईगार इ. आवश्यक कर्मचारी वर्ग कला परिसंस्था स्तरावर नियुक्त करुन नियुक्ती आदेशाची प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी. परीक्षा केंद्रावर नियुक्त करण्यात येणारे अध्यापक/कर्मचारी यांनी परीक्षेदरम्यान कोणताही गैरप्रकार होणार नाही, याची दक्षता घेऊन आपली कर्तव्ये पार पाडावीत. वेळापत्रकानुसार परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्याची सर्वस्वी जबाबदारी कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य यांची राहील.

०४. उच्चकला परीक्षा आयोजनाच्या अनुषंगाने आवश्यक सर्व नमूने व विद्यार्थ्यांचे दैनंदिन उपस्थितीपत्रक उच्चकला परीक्षेच्या वरील लिंकवर Notifications या टॅब अंतर्गत उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

०५. सैध्दांतिक व प्रात्यक्षिक विषयांच्या उत्तरपत्रिका त्या त्या दिवशी परीक्षा संपताच उपस्थिती पत्रकानुसार परीक्षार्थींच्या उत्तरपत्रिकांची संख्या अचूक असल्याबाबत खातरजमा करुन परीक्षा संयोजक (Exam Conductor) व संबंधित कुलसचिव/अधिष्ठाता/विभागप्रमुख/प्राचार्य यांच्या स्वाक्षरीने मोहोरबंद करुन कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य यांनी आपल्या अभिरक्षेत ठेवाव्यात. सदर मोहोरबंद उत्तरपत्रिका, मौखिक/अंतर्गत विषयांचे गुणतक्ते, विद्यार्थ्यांचे मुळ उपस्थितीपत्रक तसेच शैक्षणिक/परीक्षेसंदर्भातील इतर आवश्यक कागदपत्रे या कार्यालयाकडून कळविण्यात येईल त्या मुल्यमापन केंद्रावर तसेच विहित करण्यात येईल त्या कालावधीत मुल्यांकनाकरिता जमा करण्यात यावे. मुल्यमापन केंद्राबाबत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

०६. सदर परिपत्रक कला शिक्षण मंडळाच्या **https://msbae.ac.in** या संकेतस्थळावर तसेच उच्चकला परीक्षेच्या **https://mis.msbae.in** या लिंकवर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(स्मिता किंकळे)
सचिव,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ,
मुंबई.

प्रति,

१) कुलसचिव, सर ज.जी. कला, वास्तुकला व अभिकल्प विद्यालय, मुंबई.
२) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर.
३) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर.
४) विभागप्रमुख, सर ज.जी. कला महाविद्यालय, मुंबई/शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर/छत्रपती संभाजीनगर.
५) प्राचार्य, शासनमान्य अशासकीय कला परिसंस्था. (सर्व)

प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

१) निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) सहायक निरीक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय, नागपूर.
३) सहायक निरीक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.
४) निवड नस्ती.